# मराठी

वेळ : ३ तास ) ऑक्टोबर - २०१५ ( गुण : ८०

**प्र.१. खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> विषयावर सुमारे ३०० शब्दांत निबंध लिहा:** [१०]

(१) विज्ञान : तारक की मारक (२) श्रावणातला पाऊस

(३) मी परीक्षेत पहिला आलो / आले तर ...... (४) शेतकऱ्याचे मनोगत

**प्र.२.(अ) खालील काव्यवेच्याचे रसग्रहण करा :** (६) [१०]

**सगळ्याच झाडांच्या फळांवर**

सगळ्याच झाडांच्या फळांवर नसते लिहिलेले आपले नाव
सगळ्याच गावांना जाणयाइतकी नसते आपल्या पायांची धाव
आंबट म्हणू नयेत फळे आपल्या नावाची निशाणी नसलेली
नाकारू नयेत गावे आपल्या पायांनी पालथी न घातलेली
ही एवढीशी कुडी, इवलीशी ओंजळ ..... त्यात मावणार किती ?
पण हे गूढ, अनाकलनीय मन ज्याला मर्यादा न मिती
आपआपल्या कुवतीप्रमाणे स्वत:पुरतेच शोधत राहावे उत्तर
आपल्याच अर्ध्यामुर्ध्या पाकळीतून मिळवावे निदान थेंबभर अत्तर

**- कवयित्री : वृन्दा लिमये**

किंवा

**(अ) खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> विषयाशी निगडीत सुमारे १५ ते २० ओळींत संवाद-लेखन करा:** (६)

(१) 'बारावीनंतर पुढे काय ?' याविषयी दोन विद्यार्थी मित्रांमध्ये / मैत्रिणींमध्ये घडलेला संवाद.

(२) 'ओल्या कचऱ्याचे निर्मूलन' या विषयावर नागरिकांनी आरोग्याधिकाऱ्याशी साधलेला संवाद.

(३) 'स्त्रीभ्रूण हत्या' या विषयाबाबत स्त्रीरोगतज्ज्ञांशी दोन मुलींचा झालेला संवाद.

(ब) खालीलपैकी प्रश्नांच्या उत्तरांचे योग्य पर्याय निवडा : (४)

(१) खालील नामासाठी योग्य विशेषण ओळखा :

भाजी - (अ) इज्जतदार (ब) बहारदार (क) चवदार (ड) खबरदार

(२) खालील शब्दाचा समानार्थी शब्द कोणता ते ओळखा :

अधोगती - (अ) प्रगती (ब) अवनती (क) ऊर्ध्वगती (ड) दैवगती

(३) गटात न बसणारा शब्द ओळखा :

(१) लटलट - (अ) सटासट (ब) कटकट (क) वटवट (ड) झटझट

(२) पैसा - (अ) धन (ब) संपत्ती (क) रण (ड) अर्थ

प्र.३. खालील प्रश्नांच्या उत्तरांचे योग्य पर्याय ओळखून लिहा : [१२]

(अ) खालील पर्यायांतून निर्दोष शब्द ओळखाः (२)

(१) (य) क्रीडांगण (र) क्रिडांगण (ल) क्रिडांगन (व) क्रीडांगन

(२) (य) आंत:करण (र) अंत:क्करण (ल) अंतर्करण (व) अंत:करण

(ब) खालीलपैकी वाक्प्रचारांच्या अर्थाचा योग्य पर्याय निवडा : (२)

(१) पोटात कावळे ओरडणे -

(य) पोटात दुखणे (र) भुकेने व्याकूळ होणे

(ल) पोटाशी धरणे (व) किरकिर करणे

(२) कटाक्ष टाकणे -

(य) कैदेत टाकणे (र) वाळीत टाकणे

(ल) नजर टाकणे (व) दुर्लक्ष करणे

(क) (१) खालील वाक्याचे नकारार्थी रूपांतर ओळखाः (१)

वाक्य : तुम्ही कुणाचेही भले चिंता.

पर्याय : (य) तुम्ही कुणाचेही वाईट चिंतू नका.

(र) तुम्ही कुणाचे वाईट चिंतणार आहात का ?

(ल) छे छे! तुम्ही कोणाचे वाईट चिंतणार!

(२) खालील वाक्याचे प्रश्नार्थी रूपांतर ओळखा: (१)

वाक्य : गोंगाटाचं एवढं विशेष नाही.

पर्याय : (य) बापरे! केवढा हा गोंगाट!

(र) गोंगाटाचं एवढं विशेष काय आहे ?

(ल) गोंगाटाचं एवढं विशेष नाही असं नाही.

(ड) खालील वाक्यांत कोणती विरामचिन्हे वापरता येतील त्याकरिता योग्य पर्याय निवडाः (२)

(१) वाक्य: ते दु:खाश्रू होते की आनंदाश्रू निश्चितच आनंदाश्रू

(य) प्रश्नचिन्ह, उद्गारचिन्ह (र) उद्गारचिन्ह, पूर्णविराम

(ल) स्वल्पविराम, पूर्णविराम (व) एकेरी अवतरणचिन्ह, अपूर्ण विराम

(२) वाक्य: पण हाताखाली काम करणारी मुले मिळत नाहीत

(य) दुहेरी अवतरणचिन्ह, पूर्णविराम (र) एकेरी अवतरणचिन्ह, पूर्णविराम

(ल) संयोगचिन्ह, अर्धविराम (व) उद्गारचिन्ह, प्रश्नचिन्ह

(इ) खालील विधानांत / काव्यपंक्तींत कोणता रस प्रामुख्याने आढळतो, त्यासाठी योग्य पर्याय निवडा: (२)

(१) साममंत्र तो सरे, रणाची नौबत आता धडधडते.

(य) रौद्ररस (र) भयानकरस (ल) अद्भूतरस (व) वीररस

(२) उन्नीकृष्णन गेले. मी विषण्ण मनाने घरात आलो.

(य) करुणरस (र) शांतरस (ल) रौद्ररस (व) भयानकरस

(ई) खालील पारिभाषिक शब्दांसाठी योग्य पर्याय निवडा: (२)

(१) Ambassador - (य) राष्ट्रद्रोही (र) अनिवासी (ल) राजदूत (व) अग्रदूत

(२) Foundation - (य) स्थापना (र) प्रतिष्ठान (ल) संस्थापक (व) कोनशिला

प्र.४.(अ) खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर सुमारे ८० शब्दांत लिहा: (४) [७]

(१) विनोदनिर्मितीची महत्त्वाची कारणे कोणती ?

(२) नगप्या आणि त्याच्या दोस्ताची कोणती गोष्ट तुकारामाने पाहुण्यास सांगितली ?

(३) चाफा कुठे गेला ? त्याने कोणकोणता शिणगार केला ? का ?

(ब) खालीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी केवळ 'एका' वाक्यात लिहा: (३)

(१) 'विडंबन' या संस्कृत शब्दाचा अर्थ काय आहे ?

(२) तुकाराम लांडगे चालू लागला म्हणजे कसे वाटत असे ?

(३) मानसीच्या थोरल्या भावाचे नाव काय होते ?

(४) भुताच्या गोष्टी केव्हा ऐकायच्या असतात ?

(५) 'दहावीची (अ) पूर्णतयारी' या पाठाचे लेखक कोण ?

प्र.५.(अ) पुढीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे ८० शब्दांत लिहा: (८) [१२]

(१) लेखिका गिरिजा कीर यांना हिराच्या घरचे जेवण का आवडले ?

(२) चिनी शिपायाने डोग्रा जवानास का मारले ? त्याने लेखक श्याम चव्हाण यांना काय बजावले ?

(३) 'सोयरा वृक्षवल्लींचा' या पाठात बाग फुलविण्यामागे उन्नीकृष्णन यांच्या कोणत्या भावना होत्या ?

(४) फ्रामरोझला त्याचे नंदनवन कसे मिळाले ?

(ब) खालीपैकी कोणत्याही चार प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी केवळ 'एका' वाक्यात लिहा: (४)

(१) लेखकाने नंदनवन म्हणून कोणत्या शांत गावाचा उल्लेख केला आहे ?

(२) 'ए मेरे वतन के लोगों' हे गीत कोणी गायिले आहे ?

(३) हिराची आई कशी बोलत होती ?

(४) गोळीबार सुरू असताना लेखकाच्या नजरेसमोर क्षणभर कोणकोण आले ?

(५) यंत्रमानवाच्या मेंदूत कोणते नियम ठासून भरले आहेत ?

(६) उन्नीकृष्णन यांनी हारा कसा उचलला ?

प्र.६.(अ)खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे ८० शब्दांत लिहा: (८) [११]

(१) संत शेख महंमद यांनी अभक्ताचे वर्णन कशाप्रकारे केले आहे ?

(२) 'या जन्माला फुटे न भाषा' या शीर्षकाची समर्पकता स्पष्ट करा.

(३) स्त्रियांच्या जगण्याचे चित्रण कवयित्री शांता शेळके यांनी कशाप्रकारे केले आहे ?

(४) वाळलेले मळे पुन्हा बहरतील असे कवीला का वाटते ?

(ब) खालीलपैकी कोणत्याही <u>तीन</u> प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी केवळ 'एका' वाक्यात लिहा: (३)

(१) पक्व झालेले इंद्रावन दुरून कसे दिसते?

(२) अन्नदान कोणास करावे असे महात्मा फुले यांना वाटते?

(३) बर्फाचे तट पेटून उठल्यामुळे काय कोसळते आहे?

(४) मायमातीच्या लेकरांची झुंज कशासाठी आहे?

(५) जात्याचे दोन खुंटे कोणते आहेत?

प्र.७.(अ) खालीलपैकी कोणत्याही <u>दोन</u> प्रश्नांची प्रत्येकी सुमारे ८० शब्दांत उत्तरे लिहा: (८) [१८]

(१) वृत्तपत्रीय लेखाचे कोणतेही 'तीन' प्रकार थोडक्यात लिहा.

(२) आकाशवाणीवरील आर. जे. (रेडिओ जॉकी) या नवीन संकल्पनेचा परिचय करून द्या.

(३) दूरचित्रवाणीवरील सूत्र संचालनाच्या संहितालेखनाची वैशिष्ट्ये कोणती?

(४) सामाजिक संपर्कासाठीच्या संकेतस्थानांचे महत्त्व काय आहे?

(ब) खालीलपैकी कोणत्याही <u>सहा</u> प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी केवळ 'एका'वाक्यात लिहा: (८) [१८]

(१) स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये 'दर्पण' हे वृत्तपत्र कोणी सुरू केले?

(२) अग्रलेख लिहिताना संपादकाने कोणती काळजी घेतली पाहिजे?

(३) म्हैसूर संस्थानने १९३५ मध्ये स्थापन केलेल्या रेडिओ केंद्रास कोणते नाव दिले?

(४) दूरदर्शन हे माध्यम कोणत्या मंत्रालयाच्या अखत्यारीत येते?

(५) आकाशवाणीची मर्यादा कोणती?

(६) भारत सरकारच्या नियंत्रणाखाली असलेल्या सरकारी दूरचित्रवाणीचे नाव काय?

(७) 'फाईल्स' या शब्दाची मराठीतील संज्ञा लिहा.

(८) एचटीएमएल (HTML) च्या विशेष खुणांना काय म्हणतात?

(९) बातम्यांच्या स्वरूपाचे 'तीन' प्रकार कोणते?

(क) खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> विषयावर मुलाखतपूर्व तयारी म्हणून प्रश्नावली तयार करा: (४)

(१) उपाहारगृहात काम करणाऱ्या व्यक्तीची मुलाखत.

(२) राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्याची मुलाखत.

(३) एस. टी. बस चालकाची मुलाखत.